# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगर

(नॅक समिती तर्फे अ दर्जा प्राप्त)

## वित्त व लेखाविभाग

विद्यापीठ परिसर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१००४ (महाराष्ट्र)
तार :- बामुसीटी
Web Site - www.bamu.ac.in
E-mail :- financeoffice@bamu.ac.in

वित्त व लेखाधिकारी (नं.) :-२४०३३००
फॅक्स :-२४०३२९९
लेखाधिकारी (नं.) :-२४०३१२४
उप. उपकुलसचिव (लेखा) (नं.) :- २४०३१५५
सहा. कुलसचित (अंकेक्षन) (नं.) :-२४०३१२५

(दुरध्वनी कार्यालय(लेखा):अनुदान २४०३१२६,रोख २४०३१२७,देयक २४०३१२८,वेतन २४०३१२९ रोजकीर्द ०२४०३१३० प्रकाशन ०२४०३१३१)

## परीपत्रक

सर्व शैक्षणिक, प्रशासकीय विभागप्रमुख तसेच संशोधन मार्गदर्शक यांना याव्दारे सूचीत करण्यात येते की, सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षातील उपकरणे,साहित्य खरेदी, सेवा आणि देखभाल दुरुस्ती तसेच देयके सादर करण्याबाबतची सर्व कार्यालयीन प्रक्रिया करणे बाबत या कार्यालयाचे परीपत्रक **संदर्भ क्र. वित्त व लेखा/अनुदान/२०२४/ १८६९ दि. ०५.०१.२०२४** नुसार दिलेल्या मुदतीत खालील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे. तरी सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागांनी खालील तक्त्यात नमूद तारखेपर्यंत सर्व खरेदी, सेवा तथा देखभाल दुरुस्ती सदंर्भातील कार्यवाही पुर्ण करावी.

| लेखा विभागात प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्याची अंतिम दिनांक | दरपत्रके मागविणे आणि ई-निविदा प्रक्रिया करण्याची अंतिम दिनांक | खरेदी आदेशप्रपत्राची कार्यवाही करण्याकरीता लेखा विभागात प्रस्ताव सादर करण्याची अंतिम दिनांक | लेखा विभागात देयके सादर करण्याची अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| **१५/०२/२०२४ पर्यंत** | **२६/०२/२०२४ पर्यंत** | **२९/०२/२०२४ पर्यंत** | **२०/०३/२०२४** |

**सर्व प्रकारच्या देयकांची ऑनलाईन पध्दतीने अदायगी होणार असल्याने दिनांक ३१/०३/२०२४ ही देयक अदा करण्याची अंतिम दिनांक आहे. सबब, आपल्या विभागाची सर्व प्रकारची देयके ही दिनांक २०/०३/२०२४ पर्यंत लेखा विभागात जमा करण्याची जबाबदारी ही संबंधीत विभागप्रमुखांची राहील**. उपरोक्त तारखेनंतर प्राप्त होणाऱ्या प्रशासकीय मान्यता (Administrative approval), खरेदी आदेशप्रपत्रे (Purchase order) आणि देयके (Bills) बाबत वित्त व लेखा विभागाकडून कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

हे परिपत्रक सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर ][
संदर्भ क्र. वित्त व लेखा/अनुदान/२०२४/2152 ][
दिनांक:- ०९/०२/२०२४ ][

SBompwad
**वित्त व लेखाअधिकारी**

**********

**प्रतिलीपी:-**

१) मा. कुलगुरुंचे स्वीय सहाय्यक, सदरील परिपत्रक मा. कुलगुरुंच्या अवलोकनार्थ सादर करण्यास्तव अग्रेषित.
२) मा. प्र कुलगरुंचे स्वीय सहाय्यक, सदरील परिपत्रक मा. प्र कुलगुरुंच्या अवलोकनार्थ सादर करण्यास्तव अग्रेषित.
३) शैक्षणिक/प्रशासकीय विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसर व उपपरिसर धाराशिव यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव (शैक्षणिक विभागप्रमुखांनी आपल्या विभाग अंतर्गत असलेल्या सर्व संशोधन मार्गदर्शक यांच्या निदर्शनास आणून द्यावे).
४) मा. संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपपरिसर धाराशिव यांना माहितीसतव आणि योग्य त्या कार्यवाहीसतव अग्रेषित.
५) मा. कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक, सदरील परिपत्रक मा. कुलसचिवांच्या अवलोकनार्थ सादर करण्यास्तव अग्रेषित
६) मा. संचालक, परीक्षा व मूल्य मापन मंडळ यांना माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव.
७) संचालक, यु.एन.आय.सी. यांना देवून कळविण्यात येते की विद्यापीठ संकेतस्थळावर सदरील परिपत्रक प्रसिध्द करावे.
८) अंतर्गत लेखा परीक्षक, वित्त व लेखा विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, यांना माहितीस्तव.
९) कक्ष अधिकारी, (देयक कक्ष, विद्यापीठ निधी आणि देयक कक्ष (अनुदान कक्ष)
१०) भांडारपाल, ई-निविदा कक्ष, मध्यवर्ती भांडार वित्त व लेखा विभाग.